पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ३७**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ३/१२/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. १६१५**

उप आयुक्त, (परिमंडळ क्र. ५) कार्यालयाचे नियंत्रणाखालील भवानी, बिबवेवाडी, कसबा–विश्रामबागवाडा, महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयांकडील माहे ऑक्टोंबर २०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआ–५/६९६७ दि. २२/११/२०१९ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १६१६**

मा.संजय घुले व मा.सौ.प्राची आल्हाट यांचे दि. २५/११/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. २६ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये २ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९–२०२० चे अंदाजपत्रक, बजेट कोड : उए२०अ१२४९/अ६–२११, पुणे शहरातील एचसीएमटीआर रस्ते विकसित करणे | २ कोटी | -- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १) प्रभाग क्र. २६ ड शांताबाई भाजीमंडई कौसरबाग कोंढवा येथे विविध ठिकाणी दुरूस्तीची कामे करणे | -- | ५० लाख |
| २) प्रभाग क्र. २६ ड काळेपडळ, साठे नगर प्रभागात विविध ठिकाणी रोडची कामे करणे | -- | ५० लाख |
| ३) प्रभाग क्र.२६ ड महंमदवाडी येथे रोडचे उर्वरित कामे करणे | -- | ५० लाख |
| ४) प्रभाग क्र.२६ ड महंमदवाडी येथे कलवडचे उर्वरित कामे करणे | -- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १६१७**

मा.सौ.अश्विनी पोकळे यांचे दि. २६/११/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. ४२ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये ३.२५ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र | अर्थाशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१९-२० चे अंदाजपत्रक<br>बजेट कोड :- CE20A884/SA10-598 नव्याने समाविष्ट ११ गावांमध्ये रस्ता करणे. ( आंबेगाव बु.) | १ कोटी | -- |
| २ | बजेट कोड :- CE20A1266/A18-52 आगम मंदिराजवळील पाण्याची टाकी ते पतंगराव कदम यांचे बंगले दरम्यान रस्ते डांबरीकरण करणे.(आंबेगाव खु.) | १ कोटी ९० लाख | -- |
| ३ | बजेट कोड :-CE20A1266/A18-54 आंबेगाव बु.येथील सिंहगड कॉलेज परिसरात विविध रस्ते डांबरीकरण करणे. | ३५ लाख | -- |
| | नविन सुचवलेली कामे | | |
| १ | प्रभाग क्र.४२ ब मध्ये महादेव नगर चव्हाण शाळा ते पोकळे वस्ती रस्ता करणे | -- | २० लाख |
| २ | प्रभाग क्र.४२ ब मधील महादेव नगर मध्ये बालाजी ग्रीन सोसायटी रस्ता करणे | -- | २० लाख |
| ३ | प्रभाग क्र.४२ ब मध्ये धनगर वस्ती ते अंबाई माता मंदिर लेन रस्ता करणे | -- | २० लाख |
| ४ | प्रभाग क्र.४२ ब मध्ये महादेव नगर कौस्तुभ सदन ते माउली बंगला रस्ता करणे | -- | २० लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | प्रभाग क्र.४२ ब मधील महादेव नगर स.नं.५३ अ विविध ठिकाणी रस्ता करणे | -- | २० लाख |
| ६ | प्रभाग क्र.४२ ब मध्ये रायकर मळा काळूबाई मंदिर परिसर विविध ठिकाणी रस्ता करणे | -- | २० लाख |
| ७ | प्रभाग क्र.४२ ब मध्ये रायकर मळा ओम नमो रेसिडेन्सी लेन रस्ता विकसित करणे. | -- | २० लाख |
| ८ | प्रभाग क्र.४२ ब मध्ये रायकर मळा स.नं.७५/९ विविध ठिकाणी रस्ता विकसित करणे. | -- | २० लाख |
| ९ | प्रभाग क्र.४२ ब मध्ये रायकर मळा स.नं.१६९/२ विविध ठिकाणी रस्ता विकसित करणे. | -- | २० लाख |
| १० | प्रभाग क्र.४२ब मध्ये रायकर मळा स.नं.७५/५/३/२ विविध ठिकाणी रस्ता विकसित करणे | -- | २० लाख |
| ११ | प्रभाग क्र.४२ ब मध्ये उत्तमनगर येथे विविध रस्ते विकसित करणे. | -- | २० लाख |
| १२ | प्रभाग क्र.४२ ब मध्ये शिवणे येथे विविध रस्ते विकसित करणे. | -- | २० लाख |
| १३ | प्रभाग क्र.४२ ब मधील दांगट वस्ती परिसरात विविध रस्ते विकसित करणे. | -- | २० लाख |
| १४ | प्रभाग क्र.४२ ब मध्ये शिंदे पूल येथे रस्ते विकसित करणे. | -- | २० लाख |
| १५ | प्रभाग क्र.४२ ब मध्ये धनगर वस्ती ते अंबाई माता मंदिर येथे ड्रेनेज लाईन विकसित करणे | -- | १५ लाख |
| १६ | प्रभाग क्र.४२ ब मध्ये महादेव नगर कौस्तुभ सदन ते माउली बंगला येथे ड्रेनेज लाईन विकसित करणे. | -- | १५ लाख |
| १७ | प्रभाग क्र.४२ ब मध्ये रायकर मळा परिसरात ड्रेनेज लाईन विकसित करणे. | -- | १५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १६१८**

मा.सौ.अश्विनी पोकळे यांचे दि. २६/११/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. ४२ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये ८० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थाशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१९-२० चे अंदाजपत्रक पान क्र.१९८, अनु.क्र.१, बजेट कोड :- CE20A1266/A18-12 नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांमध्ये विविध विकासाची कामे करणे. | ८० लाख | -- |
| | नविन सुचवलेली कामे | | |
| १ | प्रभाग क्र.४२ ब धायरी गाव येथील जुनी तालीम नव्याने विकसित करणे. | -- | २५ लाख |
| २ | प्रभाग क्र.४२ ब धायरी येथील आरक्षित जागेवर फायर ब्रिगेड इमारत उभारणे. | -- | २५ लाख |
| ३ | प्रभाग क्र.४२ ब धायरी येथील जगुजी महाराज समाधी मंदिर परिसर सुशोभित करणे. | -- | ३० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १६१९**

मा.योगेश ससाणे यांचे दि. २६/११/२०१९ चे पत्र.

दिव्यांग नागरिकांना सध्याच्या धकाधकीच्या व महागाईच्या काळात दैनंदिन जीवन जगणे अडचणीचे ठरत आहे. सबब दिव्यांग नागरिकांसाठी मानवतेच्या दृष्टीकोनातून पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून त्यांना दिलासा देणे गरजेचे आहे

पुणे महानगरपालिका हददीतील दिव्यांग नागरिकांच्या नावावर असणा-या मिळकतीचा मिळकत कर संपूर्णपणे माफ करण्यात यावा.

**विषय क्र. १६२०**

मा.सौ.श्वेता खोसे-गलांडे यांचे दि. २७/११/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.३ब,मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे, साफसफाई करणे व तद्नुषंगिक कामे करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक,शहरातील चौकांची सुधारणा / विकासकामे करणे, वाहतूक सुधारण्यासाठी विविध विकासकामे करणे, पान क्र.२०१,अ.क्र.२० प्रभाग क्र.३ब,मध्ये विविध धोकादायक चौकांमध्ये बहिवर्क आरशे उभारणे. | १० लाख | --- |

| | | |
|---|---|---|
| नविन सुचविलेले काम – | | |
| प्रभाग क्र.३ब,मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे ,साफसफाई करणे व तद्नुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १६२१**

मा.सौ.कविता वैरागे यांचे दि. २७/११/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.२८ अ मध्ये राधा स्वामी सत्संग चौक व डायस प्लॉट चौक सुशोभिकरण करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, बजेट कोड :- CE20A103/SA13-180, प्रभाग क्र.२८ अ मध्ये बोलार्ड पोल बसविणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम – | | |
| प्रभाग क्र.२८ अ मध्ये राधा स्वामी सत्संग चौक व डायस प्लॉट चौक सुशोभिकरण करणे. | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १६२२**

मा.सौ.कविता वैरागे यांचे दि. २७/११/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.२८ अ मध्ये गोल्डन बेकरी मागील नाला स्पायडर मशीनच्या साहय्याने साफसफाई करणे व मेन ड्रेनेज लाईन साफ करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, बजेट कोड :- ZE16B103/SD3-535, प्रभाग क्र.२८ अ मध्ये धोबी घाट ते गोल्डन बेकरी पर्यंत नाला साफसफाई करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम – | | |
| प्रभाग क्र.२८ अ मध्ये गोल्डन बेकरी मागील नाला स्पायडर मशीनच्या साहय्याने साफसफाई करणे व मेन ड्रेनेज लाईन साफ करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १६२३**

मा.सौ.कविता वैरागे यांचे दि. २७/११/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.२८ अ मध्ये डायस प्लॉट येथील कॅनॉल पुलाचे सुशोभिकरण करणे. व पूनावाला गार्डन शेजारील पुलाचे सुशोभिकरण करणेसाठी र.रू.१५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, बजेट कोड :- CE17A242/SJ6-365, प्रभाग क्र.२८ अ मध्ये आंबेडकर दवाखान्यामध्ये विविध सुधारणा करणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम – | | |
| प्रभाग क्र.२८ अ मध्ये डायस प्लॉट येथील कॅनॉल पुलाचे सुशोभिकरण करणे. व पूनावाला गार्डन शेजारील पुलाचे सुशोभिकरण करणे | --- | १५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १६२४**

मा.वसंत मोरे यांचे दि. २८/११/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.४० ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक,<br>१) पान क्र. २७१, बजेट कोड – सीई२६अे३३६/एसयु१-१२९९, प्रभाग क्र.४० ड ऑलीव सोसायटी मधील अभ्यासिकेच्या समोरील उद्यानात विविध विकास कामे करणे | १० लाख | --- |

| | | |
|---|---|---|
| १) पान क्र. २७१, बजेट कोड – सीई२६अे३३६/एसयु१-१३००, प्रभाग क्र.४० ड ऑलीव सोसायटी मधील उद्यानात देखभाल दुरुस्ती विषयक विकास कामे करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे – | | |
| १) प्रभाग क्र.४० ड मधील सावित्रीबाई फुले अभ्यासिकेकरता क्लाइडिंगची उर्वरित कामे करणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.४० ड मधील सावित्रीबाई फुले अभ्यासिकेकरता विविध विकास कामे करणे | --- | १० लाख |

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १६२५**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१ नोव्हेंबर २०१९ ते १५ नोव्हेंबर २०१९ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/७४४ दि.२१/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १६२६**

दि. ११/११/२०१९ ते दि. १७/११/२०१९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण २६ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अशाद/७५५ दि. २५/११/२०१९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र.१६२७**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि.१/११/२०१९ ते दि.१५/११/२०१९ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/७६५ दि.२६/११/२०१९ चे पत्र.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. १६२८**

पुणे महानगरपालिकेच्या शहर अभियंता कार्यालयाकडील श्री.गोपीचंद दत्तु पठारे, हुद्दा – बिगारी यांच्या निलंबनास दि. ३०/८/२०१९ रोजी २ री सहामाही पूर्ण झाली असून मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार सदरची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/७४९ दि. २५/११/२०१९ चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. १६२९**

प्रभाग क्र. ३१ अ व ड मध्ये डुक्करखिंड ते तिरुपतीनगर ते दुधाने लॉन्स डी.पी. रस्ता करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोहनलाल मथरानी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४,३९,०७,५१२=१० पेक्षा ७.९७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४,०४,०८,०८३=३९ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५२,३४,१६४=३३ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ७,४४,१५५=१० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १,१३,५१४/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७५८ दि.२६/११/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १६३०**

प्रभाग क्र. २९ ब मधील मनपा शाळा क्र. ८० जी.कै.बा.ग.जगताप शाळेचे नव्याने बांधण्यात येणाऱ्या इमारतीचे उर्वरित बांधकाम पुर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सुराणा नरेंद्र फुलचंद यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,५४,२१,८२६=५० पेक्षा १% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,५२,६७,६०८=२३ उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १८,५०,६१९=१८ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ४९,४६९/- अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ६,७०,६३९/- अधिक निविदा अटी शर्तीनुसार सिमेंट

स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/७६७ दि.२६/११/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १६३१**

बंडगार्डन पाणी पुरवठा केंद्राचे कक्षेतील दैनंदिन पाणी पुरवठा सुरळीत ठेवणेसाठी व्हॉल्व्ह चालू बंद करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सुनिल वीर कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९५,४१,८००/- पेक्षा १२.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८३,१०,९०७=८० रक्कमेपर्यंत अधिक शासकीय कामगार किमान वेतन दराप्रमाणे होणाऱ्या वाढीनुसार होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करून घेणेस व त्यानुसार त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/पापु/७६९ दि. २७/११/२०१९ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. १६३२**

Empanelment of Agencies for Mobile Application Development of Pune Municipal Corporation कामी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण १५ निविदाधारकांनी सहभाग घेतला असून या निविदाधाराकांमार्फत दि. २१/०६/२०१९ रोजी तांत्रिक सादरीकरण करण्यात आले असून गुणात्मक छाननी केल्यावर मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या तक्त्यामधील निविदाधारकांची संगणक प्रणाली व मोबाईल ॲप्स विकसन करणेसाठी Empanelment Agencies नियुक्त करणेकरिता निवड करण्यात आलेली असून त्यांचेकडून सदरचे काम करुन घेण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माहिती तंत्र/५८८ दि.१७/०९/२०१९ चे पत्र.

१) पुणे मनपाच्या विविध विभागांचे संगणक प्रणाली व मोबाईल ॲप्सचे विकसन करणेसाठी Empanelment Agencies नियुक्त करणेकरिता पात्र निविदाधारक संस्थाची ३ वर्षे करिता नियुक्ती करणेस.

२) सदर Empanelment Agencies संस्थामार्फत ई-निविदा प्रकियेव्दारे दरपत्रक मागवून किमान दराचे संस्थेमार्फत पुणे मनपाकडील विविध विभागाच्या आवश्यकते व गरजेनुसार संगणक प्रणाली व मोबाईल ॲप्सची कार्यवाही करून घेणेस.

३) सदरचा खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस.

RE11N103
सन २०१९-२०२०
१ मुख्य देखरेख वसुली वगैरे.
'ड ' सांख्यिकी व संगणक कार्यालय
३ विशेष प्रकारची हिशोबी कामे संगणकामार्फत करुन घेणे व तद्नुषंगिक कामे करणे

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १३/११/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १६३३**

पर्वती टि.पी.स्किम क्र.३ येथील फा.प्लॉट क्र. २८ सदाशिव पेठ आंबिलओढा पुणे या पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या एकूण क्षेत्र २४,५४४.२३ चौ.मी. पैकी २७८९.७३ चौ.मी. इतके क्षेत्र विकसक श्री. नाईकनवरे यांचेकडे झोपडपट्टी पुर्नविकास योजनेकरिता हस्तांतरीत करणेसाठी पुणे महानगरपालिकेचे ना-हरकत पत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र यांना देणेस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/माव्य/६७८ दि.७/११/२०१९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १३/११/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १६३४**

१) मा.राजेंद्र शिळीमकर व मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि. ९/७/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४७५,दि.९/७/२०१९
३) मा.राजेंद्र शिळीमकर व मा.गोपाळ चिंतल यांची दि. १५/७/२०१९ ची उपसूचना
४) मा.मुख्य सभा ठराव क्र. २९८ दि.१५/७/२०१९

प्रभाग क्र.३६ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १००, अ.क्र. ४, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एसबी-५), पान क्र. २१६, अ.क्र. ४८१, कोथरुड विधानसभा मतदार संघात विद्युत विषयक कामे करणे | ५० लाख | --- |
| नवीन सुचविलेली कामे | | |
| १) प्रभाग क्र.३६ ब, मध्ये अभ्यासिकेकरिता संगणक खरेदी करणे | --- | २५ लाख |
| २) प्रभाग क्र.३६ ब, मध्ये विविध ठिकाणी सी.सी.टि.व्ही.कॅमेरा बसविणे | --- | २५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.
(टिप :- संदर्भ क्र. ४ नुसार सदरचा विषय मा.स्थायी समितीकडे परत पाठविण्यात आलेला आहे.)
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १९/११/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र.१६३५**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १९/११/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १६३६**

पुणे शहरातील पुलांवर नवीन प्रकाश व्यवस्था करणे व सुशोभिकरण करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त (वि) यांचे जा. क्र.मआ/विद्युत/५४८ दि.११/९/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २६/११/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १६३७**

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील मा.संचालक मंडळ सभा क्र. ५ दि.६/३/२०१९ वित्तीय वर्ष २०१९-२० मधील मा.संचालक मंडळ सभा क्र. १ दि.३/७/२०१९, मा.संचालक मंडळ सभा क्र. २ दि.१८/७/२०१९ व मा.संचालक मंडळ सभा क्र. ३ दि.७/९/२०१९ रोजीच्या सभेचा वृत्तांत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.कंपनी सेक्रेटरी आणि विधी अधिकारी, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचे जा.क्र. पीएमपीएमएल/सीएसअॅण्ड एलओ/३९४४ दि.१७/१०/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २६/११/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र.१६३८**

सन २०१९-२० च्या पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात CE22A680 ह्या अर्थशिर्षका अंतर्गत हज हाऊस बांधणे या कामाची र.रुपये ११७.५० लक्ष तरतूद प्रभाग क्र. २७ कोंढवा खुर्द स.नं. ४७/१ येथील पुणे मनपाच्या ताब्यात असलेल्या ॲमिनिटी स्पेसच्या जागेवर हज हाऊसच्या कामासाठीची तरतूद त्याच जागेवर सिव्हीक कल्चरल ॲण्ड कम्युनिटी सेंटर बांधणे या सद्यस्थितीत चालू असलेल्या कामासाठी वापरणेस मान्यता मिळणेबाबत मा.प्र.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/७०१ दि.१४/११/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २६/११/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र.१६३९**

समान पाणीपुरवठा (२४ X ७) योजने अंतर्गत संपवेल व पंपहाऊस बांधणेसाठी जुने स्ट्रक्चर्स तोडणे कामी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.प्र.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु/७५७ दि.२५/११/२०१९ चे पत्र.
१) समान पाणीपुरवठा (२४ X ७) योजने अंतर्गत पर्वती जलकेंद्र येथे नविन संपवेल व पंपहाऊस बांधणेसाठी पर्वती जलकेंद्र टप्पा क्र. १ कडील क्लेरीफायर क्र. ४ पाडून सदरची स्थावर मालमत्ता निर्लेखित करणे व विल्हेवाट लावणेस.

२) समान पाणीपुरवठा (२४ X ७) योजने अंतर्गत लष्कर जलकेंद्र येथे नविन संपवेल व पंपहाऊस बांधणेसाठी जूने लष्कर जलशुद्धीकरण केंद्र येथील सेंटलींग टँक पाडून सदरची स्थावर मालमत्ता निर्लेखित करणे व विल्हेवाट लावणेस.

**विषय क्र.१६४०**

३४ वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन २०१९ मधील विजेत्या खेळाडूंना पुणे महानगरपालिकेतर्फे रोख पारितोषिके देणेस व त्या प्रित्यर्थ होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/क्रीडा/७६६ दि.२६/११/२०१९ चे पत्र.

१. ३४ वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन २०१९ स्पर्धेत यशस्वी होणा-या स्पर्धकांना पुणे महानगरपालिकेतर्फे मान्य तरतुदीमधून र.रू. ३० लाख पर्यंतची बक्षिसे १ डिसेंबर २०१९ रोजी स्पर्धेत निकाल जाहीर झाल्यानंतर DIRECT ONLINE TRANSFER द्वारे खेळाडूंना अदा करणेस.

२. ३४ वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन २०१९ स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना बक्षिस रक्कम RE27A175 या अर्थशीर्षकातून खर्ची टाकणेस.

**विषय क्र. १६४१**

पुणे पेठ बुधवार महात्मा फुले मंडई परिसरातील हुतात्मा बाबुगेनू (आर्यन) येथील वाहनतळ ३ वर्षे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर चालविणेस देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांनी फेर टेंडर काढण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. १५५ दि.२३/८/२०१९ विचारासाठी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**